# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


जा.क्र.१०/एनजीपी/पदविका/२०१८/ ५८८
दिनांक : 13 JUL 2018

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, मुंबई, पुणे

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम, थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र, सरफेस कोटीग टेक्नॉलॉजी, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था अभ्यासक्रमाच्या प्रवेशा करीता जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यक नसल्याबाबत तसेच ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणीची तारीख वाढविल्याबाबत पत्रकार परिषद बोलवुन जास्तीत जास्त प्रसिध्दी देणेबाबत...**

**संदर्भ:-** या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक १०/एडीएम/पदविका/प्रवेश प्रक्रिया/२०१८-१९/७७६ दि. १२.०७.२०१८

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम, थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र, सरफेस कोटीग टेक्नॉलॉजी व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेशा करीता शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाची दि. ०५.०७.२०१८ रोजीची अधिसूचना व शासन निर्णयातील तरतुदीनुसार उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. सोबत शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय यांची दि. ०५.०७.२०१८ रोजीची अधिसूचना व शासन निर्णयाची प्रत जोडत आहे.

२. तसेच मागील ३-४ दिवसापासुन झालेल्या अतिवृष्टीमुळे विद्यार्थी सुविधा केंद्राकडे जाऊन पदविका अभ्यासक्रमाची ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करुन शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्याचा कालावधी वाढविण्यात आलेला आहे. त्याबाबतची संदर्भिय अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली असुन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त दोन्ही मुदयांबाबतची प्रसिध्दी करण्याकरीता आपल्या स्तरावरुन पत्रकार परिषद आयोजित करुन सदर बाबीस पालक व विद्यार्थ्यांच्या माहितीकरीता स्थानिक ७ ते ८ वृत्तपत्राव्दारे प्रसिध्दी देणेबाबत संबंधिताना विनंती करण्यात यावी. सोबत प्रसिध्दीपत्रकाचे प्रारुप जोडण्यात येत आहे.

**सोबत:-** प्रसिध्दीपत्रकाचे प्रारुप

(डॉ अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


## प्रसिध्दीपत्रक

१. प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम, थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र, सरफेस कोटीग टेक्नॉलॉजी, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेशा करीता शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांची दि. ०५.०७.२०१८ रोजीची अधिसूचना व शासन निर्णयातील तरतुदीनुसार उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही, यांची नोंद संबंधित पालक व विद्यार्थ्यांनी घ्यावी.

२. तसेच मागील ३-४ दिवसापासुन झालेल्या अतिवृष्टीमुळे विद्यार्थी सुविधा केंद्राकडे जाऊन पदविका अभ्यासक्रमाचे ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करुन शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्याची तारीख वाढवुन देणेबाबत काही संस्थांनी पत्राव्दारे या संचालनालयास विनंती केली आहे. सदरच्या विनंतीनुसार पदविका अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्याचा दिनांक पुढीलप्रमाणे वाढविण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | तपशिल | ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणीचा आधीचा अंतिम दिनांक | ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणीचा सुधारित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | Online registration of application and uploading of required documents by the Candidate for admission on website (For Maharashtra State/OMS/ J&K Migrant candidates | १६.०७.२०१८ | २०.०७.२०१८ |
| २ | थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | Online registration of application and uploading of required documents by the Candidate for admission on website (For Maharashtra State/All India candidates) | १२.०७.२०१८ | १६.०७.२०१८ |
| ३ | प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र, सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी, एच.एम.सी.टी. अभ्यासक्रम | Online registration of application and uploading of required documents by the Candidate for admission on website (For Maharashtra State/All India/ J&K Migrant candidates | १७.०७.२०१८ | १९.०७.२०१८ |

(डॉ अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई